| MHKO160000222026 | **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १/२०२६ मधील नि. ०१ वरील आदेश** |
|---|---|

१. अर्जदार क्र. १ ते ३अ,३ब,३क यांनी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३अ,३ब,३क हे कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांचे वारस आहेत आणि तसा दाखला बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरीता याकरीता दाखल केला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात पुढील प्रमाणे -**

अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे मयत कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांची मुले असुन अर्जदार क्र. ३अ या सुन व अर्जदार ३ब व ३क ही नातवंडे आहेत. कै. सुरेश पांडुरंग पोतदार हे दि.०१/०९/२०२५ रोजी व कै. सुवर्णा सुरेश पोतदार या दि.०७/०६/१९९१ रोजी मौजे मलकापुर, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापुर येथे मयत झालेल्या आहेत. तसेच कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांचा मुलगा कै. हेमंत सुरेश पोतदार हे दि.२४/०२/२०११ रोजी मयत झाले असुन अर्जदार क्र. ३अ ते ३क हे त्यांचे वारस आहेत. कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांना अर्जदार हेच कायदेशिर एकमेव सरळ वारस आहेत. अर्जदार व्यतिरिक्त मयतांना अन्य कोणीही वारस नाहीत. कै. सुरेश पांडुरंग पोतदार यांच्या नावे मौजे मलकापुर, मांजरे, कोल्हापुर यासह अनेक ठिकाणी स्थावर व जंगम मालमत्ता नोंद आहेत तसेच त्यांचे नावे अनेक वित्तीय संस्था, पतसंस्था, साखर कारखाने यांचे भागभांडवल नोंद आहेत. तसेच पतसंस्था, राष्ट्रीयीकृत बँका या ठिकाणी विविध प्रकारची खाती असुन काही ठेवी सुध्दा आहेत. कै. सुरेश पांडुरंग पोतदार यांचे आई-वडील फार पुर्वीच म्हणजे स्वातंत्र्यपुर्व काळात मयत झाले होते त्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद झालेली नाही. अशी वस्तुस्थिती असताना कै. सुरेश पांडुरंग पोतदार यांचे पश्चात त्यांचे स्थावर तसेच सरकारी, निमसरकारी

कार्यालयांना अनेक वित्तीय संस्था, पतसंस्था, साखर कारखाने यांचे भागभांडवल यांना अर्जदार यांचे नावाची वारस नोंद करतेसमयी अर्ज केले असता संबंधित विभागाकडुन वारसा दाखला आणणेबाबत सांगितल्याने अर्जदार यांना सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

३. प्रस्तुत अर्जासोबत अर्जदार यांनी नि.३ सोबत कै. सुरेश पांडुरंग पोतदार यांचा मृत्यूचा दाखला, कै. सुवर्णा सुरेश पोतदार मौजे यांचा मृत्यूचा दाखला, हेमंत सुरेश पोतदार यांचा मृत्यूचा दाखला, अर्जदार क्र. १ ते ३अ,३ब,३क यांचे आधार कार्ड व रेशनकार्ड, इत्यादी कागद दाखल केलेले आहेत.

४. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयामार्फत दि.०३/०२/२०२६ रोजी **नि. ७** नुसार जाहीरनामा काढण्यात आला आहे. त्याची एक प्रत न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दि.०५/०२/२०२६ रोजी 'दैनिक जनप्रवास' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत **नि.११** वर दाखल करण्यात आलेली आहे.

५. उपरोक्त जाहीरनामा व वर्तमानपत्रातील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडुन अर्जदार क्र. १ ते ३अ,३ब,३क नामे चारूदत्त सुरेश पोतदार, मिलिंद सुरेश पोतदार, गायत्री हेमंत पोतदार, देवयानी हेमंत पोतदार, शर्मन हेमंत पोतदार हे मयत कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढुन आक्षेप मागवण्यात आले होते. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

६. अर्जदार क्र. १ चारूदत्त सुरेश पोतदार यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **नि.८** वर अर्जातील कथनाचे पृष्ठर्थ दाखल केले आहे. मुलत: अर्जास कोणताही आक्षेप घेतला नसल्याने अर्जदार यांचा अभिलेखावरील पुरावा अबाधित राहिला आहे.

७. उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार क्र. १ ते ३ नामे चारूदत्त सुरेश पोतदार, मिलिंद सुरेश पोतदार, गायत्री हेमंत पोतदार, देवयानी हेमंत पोतदार, शर्मन हेमंत पोतदार हे मयत कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांचे वारस असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालील आदेश करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३अ,३ब,३क नामे चारूदत्त सुरेश पोतदार, मिलिंद सुरेश पोतदार, गायत्री हेमंत पोतदार, देवयानी हेमंत पोतदार, शर्मन हेमंत पोतदार हे मयत कै. सुरेश पांडुरंग पोतदार व कै. सुवर्णा सुरेश पोतदार यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारसा प्रमाणपत्र त्यांना महसुल दप्तरी नोंद करणेकरिता अदा करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी नियमानुसार होणारे न्यायालयीन शुल्क वारसा प्रमाणपत्र करण्यासाठी जमा करावे.

Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**दिनांक : २९/०४/२०२६**

**(एस.डी. बागल)**
**सह दिवाणी न्यायालय क. स्तर**
**मलकापूर शाहुवाडी**